महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
नागपूर विभागीय मंडळ, सिव्हिल लाईन्स, नागपूर-४४०००१
e-mail:- msboardnagpur@gmail.com www.nagpureduboard.in

पत्र क.नाविमं/गो. सं/ 114
नागपूर,दि 11 /01/2023

प्रति,
मा.संचालक ,
माहीती प्रसिध्दी व
जनसंपर्क कार्यालय,
नागपूर विभाग नागपूर.

विषयः–इ. 10 वी व इ. 12 वी परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कृती कार्यक्रम स्पर्धा.

संदर्भ : – राज्य मंडळ, पुणे यांचे पत्र क/परीक्षा–3/184 दिनांक – 10/01/2023

मा.महोद्य,

उपरोक्त विषयाच्या संदर्भांकित पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, माध्यमिक प्रमाणपत्र ( इ 10 वी ) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र ( इ 12 वी ) परीक्षा फेब्रु/मार्च – 2023 मधील गैरप्रकार रोखण्यासाठी विद्यार्थी , पालक , शिक्षक व समाजमाध्यम इत्यादींकडून उपाय योजना मागवून कृती कार्यक्रम स्पर्धेचे आयोजन करण्याबाबतच्या सोबत जोडलेल्या प्रकटनास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तवाहिन्या, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांनी बातम्यांचे वेळी विनामूल्य प्रसिध्दी देण्याची व्यवस्था करावी, ही विनंती.

( श्रीराम चव्हाण )
विभागीय सहसचिव
नागपूर विभागीय मंडळ, नागपूर

सोबतः– राज्य मंडळ प्रकटनाची प्रत

**प्रतिलिपीः–**

1)सचिव,राज्य मंडळ, पुणे यांना संदर्भिय पत्राचे अनुषगाने माहितीस्तव समादराने अग्रेषित.

2)शिक्षण उपसंचालक नागपूर, विभाग नागपूर यांना माहितीस्तव व उचित कार्यवाहीस्तव समादराने अग्रेषित.

3) शिक्षणाधिकारी (माध्य). जिल्हा परिषद,(भंडारा,चंद्रपूर,नागपूर,वर्धा,गडचिरोली,गोंदिया) यांना कळविण्यात येते की, आपले अधिनस्त सर्व संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाला आपल्या स्तरावर कळविण्याचे कार्यवाहीस्तव

4)मा. संपादक, दैनिक भास्कर, सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, देशोन्नती, लोकसत्ता, लोकमत समाचार, तरूण भारत, नवभारत यांना विनंती करण्यात येते आपले वृत्तपत्रातून प्रकटनास विनामूल्य प्रसिध्दी देण्याची कार्यवाही करून सहकार्य करावे ही विनंती.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे.

**प्रकटन**

**विषय :–**<u>इ.१० वी व इ.१२ वी परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी कृती कार्यक्रम स्पर्धा.</u>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेमार्फत नऊ विभागीय मंडळमार्फत माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.१० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी) या दोन सार्वत्रिक परीक्षांचे आयोजन करण्यात येते.परीक्षेच्या कालावधीत विविध मार्गांनी निष्पन्न होणा–या गैरप्रकारांचा मंडळाला सातत्याने सामना करावा लागतो.त्यादृष्टीने राज्य मंडळाच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील नऊ विभागीय मंडळे आपआपल्या स्तरावर विविध उपाययोजना आणि उपक्रम राबवित असतात. तथापि ,या प्रयत्नात एकसूत्रिपणाची गरज सातत्याने जाणवत आहे. त्यामुळे संपूर्ण राज्यासाठी एक नियोजनबध्द व सर्व समावेशक असा कृती कार्यक्रम तयार करण्याचे मंडळाने ठरविले आहे.

यासंदर्भात परीक्षेशी संबंधित सर्व घटकांच्या (विद्यार्थी,शिक्षक,पालक,समाजमाध्यम इ.) इत्यादींच्याकडून परीक्षेतील गैरमार्ग रोखण्यासाठी नाविण्यपूर्ण कृतिकार्यक्रम मागविण्यात येत आहेत. याकरिता मंडळाने गुगल फॉर्म तयार केला आहे.सदरच्या गुगल फॉर्मची लिंक खाली नमूद केल्याप्रमाणे असून ती मंडळाच्या संकेतस्थळावरही उपलब्ध करून देण्यात आली आहे.

सदर <u>कृती कार्यक्रमांचे</u> परीक्षण खालील निकषांनुसार केले जाईल.

- नाविण्यपूर्ण व उपयुक्त, व्यावहारीक कृतिकार्यक्रम .
- कमी खर्चिक, कमी मनुष्यबळाची आवश्यकता असलेला कृतिकार्यक्रम . .
- सर्वत्र राबविण्यास उपयुक्त.असा कृतिकार्यक्रम
- सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या यंत्रणेचाच वापर करून अंमलबजावणी करता येण्यासारखा कृतिकार्यक्रम
- कमी वेळेत अंमलबजावणी करता येणारा कृतिकार्यक्रम .

. खाली नमूद केलेल्या लिंकवर आपला कृतिकार्यक्रम विहित मुदतीत ऑनलाईन पध्दतीने नोंदवावयाचा आहे. या लिंकवरील प्राप्त कृतिकार्यक्रमाचे मूल्यमापन करून यापैकी दहा उत्कृष्ट,निवडक कृतिकार्यक्रमांची तज्ञ समिती मार्फत निवड करून सदर कृतिकार्यक्रम पाठविणा–यांचा मंडळामार्फत यथोचित गौरव करण्यात येईल,तज्ञ समितीचा निर्णय अंतिम असेल.

सदरचे कृतिकार्यक्रम पाठविण्याची मुदत व लिंक खालीलप्रमाणे आहे.

**बुधवार दि.११.०१.२०२३ ते शुक्रवार दि.२०.०१.२०२३**

**गुगल लिंक :– https://forms.gle/yTxy21P93W8d4foAA**

दिनांक :–१०/०१/२०२३

(अनुराधा ओक)
सचिव,
राज्यमंडळ,पुणे